भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
स्थापना १९८१

# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

| वर्ष ८ वे | जानेवारी, २०१३ | अंक ४ था |
|---|---|---|

**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर** **सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर** **कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ०९८५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
०९८५०७५४२१०

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२-२५२४२७०६
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव : ०९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई : ०९७६९३२९९९३
श्री. गजानन पाटगांवकर, ठाणे : ०९९६९२७६९२६
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ०९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७-२६०१४५७
प्रा. शिरीष दिलीप फडणीस, सातारा : ०९८९००४००२६
श्री. सुनील जठार, राजापूर : ०९२७०५७९४००
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ०९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली : ०९८२२९९५८९२
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ०९२२७१३५७९४

**इतर संघांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**

**मुखपृष्ठ कु. कोजागिरी गुर्जर, पुणे**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) (२०१२-१३ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, मनिऑर्डर, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५१०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्त्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी श्री. गजानन पाटगांवकर, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**- श्री. हेमकिरण बाक्रे**


**नियतकालिकाचे नाव** : 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


४ भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा

७ उपेक्षित गुणी गायिका - सुमन कल्याणपूर

११ छंद माझा वेगळा...

१२ पवित्र अन् रमणीय - बद्रीकेदार

१५ 'कॅन्सर माझा सांगाती'

१८ कारखानीस

२१ संस्थावृत्त

२३ संस्थावृत्त

२४ संस्थावृत्त



'संपर्क' हे नियतकालिक भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने ज्ञाती बांधवांसाठी एकवीरा प्रकाशन व प्रसिद्धीसेवा, कर्वेनगर येथे छापून, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, 'अनिश प्रासाद', ४३७, नारायण पेठ येथे प्रसिद्ध केले.


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**- संपादक**

संपर्क



# संपादकीय

अलिकडेच वाचनांत आले की, किंगफिशरचे श्री. विजय मल्या यांनी तिरुपती देवस्थानला रु. १ कोटी देणगी म्हणून दिले. तसे पहायला गेले तर हा प्रकार नवीन मुळीच नाही.. पण आता तो श्री. विजय मल्यांच्या बाबतीत ठळकपणे प्रसारमाध्यमातून चर्चिला गेला, कारण त्यांनी किंगफिशर या डबघाईला आलेल्या त्यांच्या विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांना पगारही दिले नाहीत, मग ते एवढी देणगी देऊ कसे शकले?

पण आपण सामान्यजन ह्या कृतीने एवढे दिपून जातो की, प्रसिद्ध व्यक्तिंचे गुन्हे आपण एकदम माफ करुन टाकतो. पण हे पैसे संबंधित माणसाने कसे मिळविले असतील व तो एवढा उदार का झाला असेल? याचा अजिबात विचार करत नाही.

काही कामानिमित्त बेंगलोरला जाण्याचा योग आला व एका मित्राशी चर्चा करीत असताना, त्याने अगदी सहज गप्पांच्या ओघात सांगितले, सध्या धंदे अतिशय जोरांत चालू आहेत व ते म्हणजे शिक्षण. देवालये व उच्चतांत्रिक रुग्णालये, श्री. विजय मल्यांची बातमी वाचल्यावर मला त्या मित्रांच्या या टिप्पणीची खूप आठवण झाली.

सभोवताली आपण बऱ्याच गोष्टी पहात असतो. अगदी बारीक सारीक गोष्टीसुद्धा सूक्ष्मपणे निरीक्षण केल्यावर खूप काही सांगून जातात. पण आपली निरीक्षणशक्ती व संवेदनशीलता आपण गमावून बसलोय की काय; असे हल्ली वाटू लागले आहे.

मला देवाचे वावडे मुळीच नाही. परंतु ज्या प्रवृत्ती आता देव या संकल्पनेभोवती जमू लागल्या आहेत, त्याची खरेच खूप काळजी वाटू लागली आहे. आपल्या या श्रद्धेचा, भोवतालचे लोक त्यांच्या स्वार्थासाठी फायदा करुन घ्यायला लागले आहेत व हे समजूनही आपण त्यांना फायदा करुन देत आहोत, याचे जास्त दु:ख वाटते.

आपण हैद्राबाद, जयपूर इत्यादी ठिकाणी बिर्लांची मंदिरे पाहिली असतील. ज्यांनी गोव्याला भेट दिली असेल, त्यांनीही तेथील देवळांचा कायापालट पाहिलाच असेल. आपण तो झालेला कायापालट पाहून हरखून जातो, आनंदित होतो व मनोभावे त्या सजविलेल्या मुर्तीला नमस्कार करुन बाहेर पडतो. पण त्याच वेळेस आपण हे लक्षांत घेत नाही की, देवालयाची प्रगती ही कुणीतरी मोठी देणगी दिलेली असते. त्यातून झालेली असते. सर्व सामान्यांनी दिलेल्या पैशातून नव्हे; पण आपण आपल्या मनाचे समाधान करुन घेतो की, बाबा आपल्याला जमत नाही, निदान जो करतोय् त्याला तरी करु दे ! पण त्याचवेळेस संबंधितानी तो पैसा कसा मिळविला असेल, याची तमा आपण बाळगत नाही.

सध्या 'इव्हेंट मॅनेजमेंट'चा जमाना आहे. आपल्या घरांतच लहान मुलांच्या वाढदिवसापासून त्याची तयारी सुरु होते व पुढील आयुष्यांत प्रत्येक समारंभ उदा. मुंज, लग्न, नोकरीतील बढती, व्यवसायातील प्रगती अशी निरनिराळी कारणे आपल्याला इव्हेंट साजरा करण्यांसाठी पुरतात. आता तर जागतिकीकरणांमुळे तरुण पिढीच्या हातात भरपूर पैसा खेळू लागला आहे व म्हणून त्याला पुरक अशी अनेक कारणेही इव्हेंटसाठी मिळतात.

कुठलाही इव्हेंट साजरा करतांना आपल्या घरांतल्या निरनिराळ्या कामांसाठी आलेल्या महिला त्यांच्या मुलांचा वाढदिवस साजरा कशा करत असतील, याचा विचार तरी आपल्या मनांत येतो का? नाही. आपण आपल्याच गुर्मीत असतो. आपल्या इव्हेंटचा त्या गरीब लोकांवर काय परिणाम होईल याचा विचार करावयाची आपली तयारी नसते.

एकूण काय तर, सभोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करणे, घडणाऱ्या अनेक गोष्टींबद्दल विचार करणे व आत्मविश्वासाने आपण समाजासाठी 'फुल ना फुलाची पाकळी' या स्वरुपात, आपल्या कुवतीनुसार समाजऋण फेडायचा संकल्प नवीन वर्षाच्या निमित्ताने आपण करुया कां? अर्थात् संकल्प करायचा तो संकल्पपूर्तीसाठी !

जानेवारी महिन्यांत २३ तारखेला तीन महान नेत्यांची जयंती आहे. श्री. बाळासाहेब ठाकरे, श्री. सुभाषचंद्र बोस व स्वामी विवेकानंद. आपण त्यांना अभिवादन करुन, त्यांनी केलेल्या देशसेवेची आठवण ठेऊन, आपल्या नवीन वर्षाची सुरुवात करुया.

आपणांस नवीन वर्ष सुखासमाधानाचे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद!

# भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची, वार्षिक सर्व साधारण सभा पुणे येथे संपन्न

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची, वार्षिक सर्व साधारण सभा पुणे येथील ना.सी.फडके सभागृहांत शनिवार दि. ८-१२-२०१२ रोजी १० ते १ व दुपारी २ ते ४ अशा २ सत्रांत आयोजित करण्यात आली. या सभेस खालील संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**महासंघाचे पदाधिकारी**

**अध्यक्ष : श्री पराडकर आनंद विनायक**

**कार्यवाह : श्री भाटवडेकर गोपाळ भास्कर**

**कोषाध्यक्ष : श्री जोशी चंद्रशेखर पांडुरंग**

**१ ठाणे** – अ) श्री. आठल्ये अभय श्रीहरी,
ब) श्री. आंबर्डेकर संजय रामचंद्र

**२ पुणे** – अ)श्री. गुर्जर गणेश गंगाधर,ब) श्री. बाक्रे हेमकिरण,
क)श्री. फणसळकर मकरंद चंद्रकांत

**३ बेळगांव** – अ) श्री. जोशी सीताकांत गणपती,
ब)श्री. पुराणिक प्रदीप माधवराव,
क) श्री. कानेटकर शिरीष

**४ रत्नागिरी** – अ)श्री. जठार सुनील मनोहर,

**५ कोल्हापूर** – अ)श्री. पावनगडकर मिलिंद,
ब)श्री. खंडकर आनंद ल.,

**६ मुंबई** – श्री. तांबे अविनाश रामचंद्र

**७ डोम्बिवली** – अ) श्री. सरपोतदार मोहन सखाराम,
ब)श्री.कोनकर प्रभाकर वामन,
क)श्री.भागवत सुहास भा.,
ड)श्री हर्डीकर श्रीकांत ग.
इ) सौ प्रभुदेसाई स्वाती ल.

**८ सातारा** – अ)श्री. मोघे मुकुंद विष्णू,
ब)श्री. पंडित यशवंत विश्वनाथ

**९ नागपूर** – अ)श्री. जावडेकर अविनाश वासुदेव

**१० बडोदा** – अ) श्री. पानवलकर नरेंद्र ह.,
ब) श्री. हर्डीकर उल्हास रा.,
क)सौ. पंडित अनुश्री अ.

**११. सोलापूर** – अ)श्री. माईणकर श्रीकांत सीताराम,
ब)सौ. माईणकर अंजली श्रीकांत

**१२. इंदूर** – अ)श्री. आठल्ये श्रीकांत भास्कर

**१३ व्यवस्थापन पुणे कऱ्हाडे ब्राह्मण संघ**

अ.श्री गुर्जर श्रीकांत कृष्णराव

ब. श्री भोपटकर जयवंत हनुमंत

क. श्री देसाई लक्ष्मीकांत

ड. श्री पुराणिक हेमंत

सर्व उपस्थित सभासदांचे पुणे संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर यांनी स्वागत केले आणि प्रत्येक सभासदांचे सभेसाठी तयार केलेले कीट दिले असल्याचे नमूद केले. सर्व प्रथम महासंघाच्या सभासद संघाच्या कार्यकारी मंडळाचे हुबळी संघाचे प्रतिनिधी श्री.स्वादी यांचे अकाली निधनाबद्दल दु:ख व्यक्त करण्यांत आले आणि त्यांना सभेने १ मिनिट उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली. श्री. गणेश गुर्जरांनी आणि श्री. आनंद पराडकर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे तसेच गोपाळ भाटवडेकर यांनी सभेची सूत्रे हाती घ्यावी अशी विनंती केली आणि सभेचे नियमित कामकाज सुरु झाले.

विषय सूचीनुसार पूर्व सचिव श्री. सुहास भागवत डोंबिवली संघ यांनी, मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले आणि त्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव सादर केला. ठराव मंजूर करावा म्हणून श्री. अभय आठल्ये, ठाणे संघ यांनी सुचवले, तर श्री. हेमकिरण बाक्रे यांनी त्यास अनुमोदन दिले व ठराव सर्वांनुमते मंजूर झाला. श्री. सुहास भागवत यांनी मागील वर्षाचे आयव्यय पत्रक आणि ताळेबंद सादर केला, त्यावर चर्चा झाली आणि History Writing Rs.५०१/- संपर्क वर्गणी रु.६०/- आणि Life member वर्गणी रु.५५००/- हे सर्व Corpus fund मध्ये जमा करावेत व ताळेबंद स्वच्छ करावा असे श्री अभय आठल्ये यांनी सुचवले तर आयव्यय खात्यांमध्ये जाहिरात जमा व संपर्क वर्गणी जमा अशी वेगवेगळी खाती करावी, अशी सूचना श्री. अविनाश तांबे, श्री.गणेश गुर्जर(पुणे) यांनी केली व अन्य चर्चा झाल्यावर आर्थिक पत्रकांस मंजूरी देण्यांत आली.

महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी,बेळगांव यांनी वर्ष २०१२-२०१३ व २०१३-२०१४ साठीचे अंदाज पत्रक सभेस सादर केले. वर्ष २०११-२०१२ च्या आर्थिक पत्रकांना मंजूरी मिळाली आणि आता वर्ष १२-१३ अर्धे संपले, त्यामुळे यावर्षी झालेल्या खर्चानुसार अंदाज वर्ष २०१३-२०१४ साठी केले आहे, कारण पुढील वार्षिक सर्व साधारण सभा ही सप्टेंबरमध्ये होणार आहे. श्री. जोशी बेळगांव संघ यांनी अंदाज पत्रकांत संपर्कचे सभासद अंदाजे १०० वाढतील, तर संघांचे सभासद वर्गणीद्वारा रु.२५०००/- जमा होतील. या उत्पन्नांच्या बाजू तर संपर्कचे छपाई साठी ६००००/- व पोस्टेजला या वर्षी रु.१२६००/- तर पुढील वर्षी रु.४६००/- अंदाजे खर्च येईल असे सांगितले. कारण संपर्कचे रजिस्ट्रेशन झाल्यावर पोस्टाची सवलत मिळेल, त्यामुळे प्रत्येक अंकापोटी रु.५/- वाचतील. महासंघाच्या कार्यकारीणी सभासदांना संघाशी संपर्कासाठी प्रवास करावा लागेल, त्यामुळे कार्य वाढेल. वार्षिक सर्व साधारण सभा खर्च रु. २००००/- व पुढील वर्षी रु.१५०००/- अशी तरतूद केली आहे, असे सांगून महासंघास १२-१३ मध्ये अंदाजे रु.४००००/- तर १३-१४ मध्ये रु.८५०००/-. उत्पन्न होईल असे प्रतिपादन केले. महासंघाची वेबसाईट असावी त्यासाठी तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तींची मदत घेऊन सुरु करण्याचा विचार श्री. आठल्ये, श्री.गुर्जर आणि श्री. बाक्रे, श्री. आंबर्डेकर यांनी मांडला, त्यास अंदाजे रु.१५०००/- खर्च येईल. त्यास आणि अंदाज पत्रकास मंजूरी द्यावी असे सुचवले. श्री. गणेश गुर्जर यांनी ठराव मांडला, तर श्री. माईणकर सोलापूर संघ यांनी त्यास अनुमोदन दिल्यानंतर सर्वांनुमते ठराव मंजूर झाला. ठाणेसंघाचे श्री. आठल्ये यांनी घटना दुरुस्ती या विषया ऐवजी छोटे २ विषय पूर्ण करावेत अशी विनंती केली ती अध्यक्ष आनंद पराडकर यांनी मान्य करुन महासंघाचे रजिस्ट्रेशनचा विषय घ्यावा असे सांगितले.

श्री. गणेश गुर्जर अध्यक्ष, पुणे संघ यांनी महासंघाचे सभासद यांचे धर्मादाय आयुक्तांकडे रजिस्ट्रेशन आहे. परंतु महासंघच अजून रजिस्टर्ड नाही. जेथे सार्वजनिक विश्वस्त संघाकडे पैशांचे व्यवहार सुरु होतात, त्यावेळी त्याचे रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे असे सांगून ते पुणे येथे करावे असे सुचविले. यावर श्री. कोनकर डोंबिवली संघ यांनी हे रजिस्ट्रेशन कां झाले नाही, त्यामध्ये काय अडचणी आहेत. महासंघाचे सदस्य संघ हे फक्त महाराष्ट्रातच नाहीत तर, ते भारतातील अनेक राज्यांत आहेत. रजिस्ट्रेशन करुन पुढे बंद पडल्यास काय करायचे, या सर्वांचा विचार करुन महासंघाचे रजिस्ट्रेशन करावे असे सूचीत केले यावर अभय आठल्ये, आंबर्डेकर, पुरोहित, पानवलकर यांनी सूचना केल्या, चर्चा केली आणि हे काम पुण्याच्या संघाने पूर्ण करावे असे सर्वांनुमते ठरले. यानंतर संपर्कचा विषय संपादक श्री.हेमकिरण बाक्रे यांनी सभेपुढे सादर केला. आजपर्यंत संपर्कचे RNI Delhi कडे रजिस्ट्रेशन नाही आणि त्यामुळे जर RNI ने विनापरवानगी छपाई करत असल्याने दंडात्मक कारवाई होईल व त्यामुळे रजिस्ट्रेशन अनिवार्य आहे आणि ते केल्याने पोस्टाची सवलतही मिळेल व पोस्टेजचा खर्च ही मोठ्या प्रमाणावर कमी होईल असे सांगितले. ते आपण अंदाज पत्रकांत पाहिले आहे. पोस्टाच्या नियमानुसार दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक यांना रु. ०.५० पैसे तर त्रैमासिकाला रु.२/- पोस्टेज लागेल असे समजले आहे. याशिवाय संपर्कचे वितरणासाठीची व्यवस्थाही करणे आवश्यक आहे. पोस्टाने पाठवून खर्च होऊन जर सभासदांना अंक मिळत नसतील, तर त्यावर उपाय म्हणून महासंघाच्या प्रत्येक सभासद संघाने जो एक प्रतिनिधी नेमायचा आहे. त्याने संपर्क वाटपाची, जाहिराती, साहित्य मिळवण्याची आणि ती पाठवण्याची जबाबदारी घेणारी व्यक्तीच नेमावी; म्हणजे त्या संघाकडे कुरीअरद्वारा संपर्क पाठवण्याची व्यवस्था करता येईल. सदर रजिस्ट्रेशनला रु.१००००/- पर्यंत खर्च येईल त्यास मंजूरी द्यावी असे प्रतिपादन केले. सूचक श्री. अविनाश तांबे मुंबई संघ, अनुमोदक श्री. आंबर्डेकर ठाणे संघ, यानंतर महासंघाचे सचिव श्री. भाटवडेकर यांनी घटना वाचून दाखवण्यास सुरवात केली आणि प्रत्येक मुद्यांवर उपस्थित सभासदांनी सूचना, आक्षेप घेतले. घटना होणे आवश्यक आहे. त्यामध्ये महासंघाच्या कार्यकारी मंडळात प्रत्येक संघाचा प्रतिनिधी हवा तो प्रतिनिधी जर पदाधिकारी झाला, तर त्या ऐवजी आणखी प्रतिनिधी पाठवावा. सध्या अध्यक्ष सचिव व कोषाध्यक्ष हे वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने अडचणी होतात. त्यासाठी एक Sub कमिटी नेमून तिने काम पहावे असे ठरले. जेथे सचिव असेल तेथील संघातील तीन सभासद हे सदस्य राहतील असे पहावे असे ठरले. अशी सर्व चर्चा झाल्यावर या घटनेचे प्रारुप एखाद्या वकीलांना दाखवून त्यांचा सल्ला घेऊन तयार करुन महासंघाच्या सदस्य संघाला पाठवावे आणि त्यांना एक महिन्याचा अवधी द्यावा, या अवधीमध्ये सर्व संघांनी दुरुस्त्या सुचवाव्यात त्या न आल्यास त्या संघांची मान्यता आहे असे गृहीत धरण्यांत येईल. यासाठी सध्या आजच्या दिवशी सभेने तत्वत: मान्यता द्यावी. असे श्री. गुर्जर अध्यक्ष पुणे संघ यांनी सुचवले व त्यास सर्वांनी मान्यता दिली. ठरावास सूचक श्री. अविनाश तांबे मुंबई, अनुमोदक श्री. प्रभाकर कोनकर, डोंबिवली संघ ठराव सर्वांनुमते मंजूर झाला. भोजन व विश्रांती नंतर दुसरे सत्र सुरु झाले. त्या सत्रामध्ये मा. अध्यक्षांनी प्रत्येक संघाने आपल्या संघाची माहिती, कार्यक्रम याबाबत सांगावे असे सूचित केले. त्यावर प्रत्येक संघाने आपापल्या संघाची माहिती सांगितली.

१) डोंबिवली – शैक्षणिक मदत. निराधार वृध्दांना मदत, आरोग्य समिती, नगर कार्यकारिणी व वधुवर सूचक मंडळ, रक्तदान शिबीर असे अनेकविध कार्यक्रम – ह्यामुळे इतर संघास मार्गदर्शक ठरतील.

२)बेळगांव – इतर कार्यक्रमांसोबत बेळगांवातील इतर ब्राह्मण संघाशी संपर्क, मेळावे, अन्य चार कार्यक्रम करतात. शैक्षणिक शिष्यवृत्ती इ.

३) मुंबई – संघातर्फे २ कार्यक्रम असतात, 'संक्रात संमेलन' आणि 'वासंतिक मेळावा', शैक्षणिक मदत रु ६००००/- पर्यंत, संघाची वास्तू आहे.

४) सोलापूर – १८ जून झाशीराणी स्मृतीदिन करतात आणि अन्य कार्यक्रम असतात. बडोदा अधिवेशनांत ठरल्यानुसार झाशी राणी स्मृती दिन १८ जूनला करावा.

५) रत्नागिरी – ४ कार्यक्रम करतात, शैक्षणिक पुरस्कार, वसतीगृहाची वास्तू आणि स्वत:ची इमारत आहे.

६) बडोदा – अन्य कार्यक्रमाबरोबर रिमांडहोम मधील मुलांना स्टेशनरी पॅकेट वृध्दाश्रमांत मिठाईवाटप आणि ८० जी.

७) सातारा – संघास १० वर्षेच झाली आहेत. विमा महर्षी चिरमुले स्मृती दिन साजरा करतो.

८) कोल्हापूर – रौप्य महोत्सवानिमित्ताने वर्षभर भरपूर कार्यक्रम.

९) नागपूर – शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत, ज्येष्ठांना मदत, महिला स्पर्धा ८० जी साठी प्रयत्न चालू.

१०) पुणे – संघाची स्वत:ची वास्तू, शिवाय १६ गुंठे जागा आहे. ज्येष्ठांचा सत्कार, शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत, महिला उद्योजक सत्कार, दरवर्षी ४ कार्यक्रम, वधुवर मेळावे. त्यातून विवाह जमतात.

सभासदांनी अशाही सूचना केल्या की, वर्षातून २ वेळा सभा घेण्यांत याव्यात मे १३ मध्ये पुणे येथे व डिसें. १३ मध्ये कोल्हापूर येथे व्हावी असे ठरविण्यात आले. अध्यक्षांनी आपल्या समारोपाच्या भाषणांत, सर्व सभासदांच्या सूचनांचा विचार केला जाईल आणि संघाचे कार्यास गती येण्यासाठी सर्वांच्या सक्रीय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. सचिव श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी उपस्थितांचे आणि पुण्याच्या संघाने केलेल्या व्यवस्थेबद्दल आभार मानले. उपस्थित सर्वच सभासदांनी वार्षिक सर्व साधारण सभेसाठी पुणे संघाने केलेल्या उत्तम व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केले आणि आभार मानले.

## दुःखद निधन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे आणि भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे माजी अध्यक्ष डॉ. कमलाकर वि. श्रीखंडे यांचे दि. १४/१२/१२ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. पुणे संघ आणि महासंघाच्या कार्यात त्यांनी भरीव कार्य केले.

**''ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो''**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN
- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# उपेक्षित गुणी गायिका - सुमन कल्याणपूर

**दीपक दीक्षित, बेळगांव**

**सुमनताई आधी हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावल्या व नंतर मराठी चित्रपटसृष्टीत आल्या व आपला खोलवर ठसा उमटविला. १९५६ साली त्यांनी गायिलेले, चार मराठी चित्रपट प्रदर्शित झाले. 'दिसतं तसं नसतं', 'पसंत आहे मुलगी', 'पायदळी पडलेली फुले व देवघर' या चारही चित्रपटातील त्यांनी गायिलेली गाणी गाजली. या चित्रपटाद्वारे त्या ग.दि.मा, बाबूजी व राजा परांजपे यांच्या संपर्कात आल्या. १९६१ साली दोन महत्त्वाचे चित्रपट प्रदर्शित झाले.**

**२८ जानेवारी हा ख्यातनाम गायिका, सुमन कल्याणपूर यांचा जन्मदिन. त्यांना ७६ वर्षे पूर्ण होतील. त्यानिमित्त...**


सत्तरच्या दशकात गणेशोत्सव, लग्नाच्या वरातीत बॅन्डवर दोन मराठी गाण्यांनी धुमाकूळ घातला होता. सुधीर फडकेंचे 'देहाची तिजोरी' व सुमन कल्याणपूरचे 'केशवा माधवा, तुझ्या नामात रे गोडवा', रमेश अणावकरांच्या शब्दात गोडवा आहे, केशवाच्या नामात गोडवा आहे, गाण्यात गोडवा आहे, संगीतात गोडवा आहे. मुख्य म्हणजे सुमनताईंच्या आवाजात गोडवा आहे. अशा या गोड गळा असलेल्या सुमनताईंचा जन्म २८ जानेवारी १९३७ रोजी फाळणीपूर्व बंगालमधील कलकत्याच्या भवानीपूरमध्ये झाला. त्यांचे माहेरचे आडनाव हेमाडी. त्यांचे वडील सेंट्रल बँकेमध्ये वरिष्ठ पदावर होते. सुमनताईंचे बालपण ढाक्कामध्ये गेले. फाळणीपूर्व अस्थिर वातावरण जातीय दंगे यामुळे १९४२ साली हेमाडी कुटुंब मुंबईला परतले. सुमनताईंवर आरंभी शास्त्रीय संगीताचे संस्कार तावडेबुवा गुरुजींनी केले. अब्दुल रेहमान खाँ यांच्याकडेही त्या तीन वर्षे शिकल्या. सुगम संगीताचे संस्कार त्यांच्यावर यशवंत देव यांनी केले. १९५३ साली निर्माते प्रभाकर रानडे यांनी 'शुक्राची चांदणी' हा चित्रपट काढायचे ठरविले. संगीताची जबाबदारी यशवंत देवांवर होती. दादरच्या बॉम्बे लॅबमध्ये पहिल्या गाण्याचे रेकॉर्डिंग सुमनताईंच्या आवाजात झाले. गाणे होते,

**'प्रभू तुझ्या विश्वामध्ये काय कमी आहे,**
**मला हवे तेही आहे, परि नको तेही आहे'**

या गाण्याद्वारे सुमनताईंचा चित्रपट क्षेत्रातील पार्श्वगायनाचा प्रारंभ झाला, ही शुक्राची चांदणी उगवलीच नाही. पण या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्यावेळी योगायोगाने प्रसिद्ध संगीतकार महमद शफी हजर होते. त्यांना सुमनताईंचा आवाज आवडला व त्यांनी आपल्या एका चित्रपटासाठी त्यांना संधी दिली. या चित्रपटासाठी त्यांनी 'कोई पुकारे धीरेसे तुझे' ही लोरी व आणखी दोन गाणी गाऊन घेतली. नंतर या चित्रपटाचे संगीतकार बदलले व ओ.पी. नय्यरकडे सूत्रे आली. या चित्रपटात नंतर फक्त लोरी राहिली व इतर दोन गाणी वगळली गेली. दरम्यान हिंदी चित्रपटसृष्टीत नवा आवाज आलेला आहे, ही बातमी सगळीकडे पसरली. नंतर त्यांना लगेच 'दरवाजा' चित्रपट मिळाला. या चित्रपटातील तलत बरोबरचे गाणे गाजले व चित्रपट संगीताच्या दुनियेत सुमनताईंनी बस्तान बसवले. सुरुवातीला दुय्यम गटात मोडतील असे चित्रपट त्यांच्या वाट्याला आले. चित्रपट जरी दुय्यम गटातील होते, तरी गाणी मात्र मधुर होती व गाजत होती. दरम्यान १९५८ मध्ये त्यांचे लग्न झाले व त्या सुमन कल्याणपूर झाल्या. लग्नानंतर सहा महिन्यांनी त्यांनी परत गायला सुरुवात केली ती 'सट्टाबाजार' या चित्रपटाने, त्यानंतर १९८० पर्यंत सतत २२ वर्षे गात होत्या.



सुमनताई आधी हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावल्या व नंतर मराठी चित्रपटसृष्टीत आल्या व आपला खोलवर ठसा उमटविला. १९५६ साली त्यांनी गायिलेले, चार मराठी चित्रपट प्रदर्शित झाले. 'दिसतं तसं नसतं', 'पसंत आहे मुलगी', 'पायदळी पडलेली फुले व देवघर' या चारही चित्रपटातील त्यांनी गायिलेली गाणी गाजली. या चित्रपटाद्वारे त्या ग.दि.मा, बाबूजी व राजा परांजपे यांच्या संपर्कात आल्या. १९६१ साली दोन महत्त्वाचे चित्रपट प्रदर्शित झाले. 'मानिनी' आणि 'पुत्र व्हावा ऐसा'. 'मानिनी' चित्रपटातील 'अरे संसार संसार' हे गाणे तुफान गाजले व या गाण्याने सुमनताईंना प्रचंड लोकप्रियता मिळाली. या गाण्यासाठी त्यांना 'रसरंग फाळके' गौरव पुरस्कार मिळाला. 'पुत्र व्हावा ऐसा' या चित्रपटातील कवी पी. सावळाराम, संगीत वसंत प्रभू यांचे 'जिथे सागरा धरणी मिळते'


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

हे गाणे इतके लोकप्रिय झाले की, या गाण्याच्या रॉयल्टीने निर्मात्याला झालेले आर्थिक नुकसान भरून आले. मराठी चित्रपट तमाशा व ग्रामीण पटाकडे वळला व सुमनताई मराठी चित्रपटसृष्टीपासून दूर झाल्या. त्यांना १९६५ व १९९६ साली 'सुखाची सावली' व 'वावटळ' या चित्रपटांसाठी महाराष्ट्र शासनाचा 'सर्वोत्कृष्ट गायिकेचा' पुरस्कार मिळाला.

एच.एम.व्ही. तर्फे ध्वनिमुद्रित झालेली 'नंदा घरी नंदनवन फुलले' व 'सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले' ही सुमनताईंची गाणी लोकप्रिय झाली व मराठी भावगीतांच्या क्षेत्रात, सुमनताईंचा प्रवेश झाला. यशवंत देव, वसंत प्रभू व दशरथ पुजारी हे सुमनताईंचे सुरुवातीचे महत्त्वाचे संगीतकार. त्यात त्यांचे विशेष सूर दशरथ पुजारींशी जमले व त्यांनी मराठी रसिकांना उत्तमोत्तम भाव, भक्तीगीतांचा नजराणा दिला. मधुकर जोशींची 'आकाश पांघरूनी, जग शांत झोपलेले', 'या लाडक्या मुलांनो', 'रिमझिम झरती श्रावणधारा' या गाण्यांना सुमनताईंनी न्याय दिला. असे म्हणतात की, रिमझिम झरती श्रावणधारा या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्यावेळी भर उन्हात पावसाने हजेरी लावली. अशोक पत्की, अशोकजी परांजपे, कमलाकर भागवत व सुमनताईंनी 'केतकीच्या बनी तिथे', 'नाविका रे', 'पाखरा जा', 'वाट इथे स्वप्नातील संपली जणू' सारखी गोड गाणी दिली. बेळगावचे कवी कृ. ब. निकुंब यांचे 'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात' हे गाणे सुमनताईंनी गायलेले आहे. हे गाणे ऐकताना कुठल्याही सासुरवाशीणीच्या डोळ्यात पाणी येते.

मराठी चित्रपट व भावगीतात त्यांनी, आपला स्वतंत्र ठसा उमटविला. पण तसा ठसा हिंदी चित्रपट संगीतात उमटविता आला नाही. लता मंगेशकरची सावली याच दृष्टिकोनातून त्यांच्याकडे बघितले गेले. यात कुणाचाही दोष नाही पण, घडले हे असे आहे. सुमनताईंनी मराठी व हिंदी चित्रपट संगीत आणि मराठी भावगीतासाठी जे योगदान दिले आहे, त्याला तोड नाही. पण मराठी माणूस, संस्था व महाराष्ट्र सरकारनी त्यांची उपेक्षा केली आहे. त्यांना खूप उशिरा महाराष्ट्र सरकारनी लता मंगेशकर पुरस्कार दिला. आता तरी महाराष्ट्र सरकारने सुमनताईंचा महाराष्ट्र भूषण, पुण्यभूषण व इतर पुरस्कारासाठी विचार करावा व पद्म पुरस्कारासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी व त्याचा पाठपुरावा करावा. दादासाहेब फाळके पुरस्कार लता मंगेशकर व आशा भोसले यांना मिळाला आहे. सुमनताईंचेही या क्षेत्रात योगदान कमी नाही 'दादासाहेब फाळके' पुरस्कार सुमनताईंना मिळायला हवा. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने, प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना लाख लाख शुभेच्छा!


**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**




**कोंकण काजू**

**उत्पादक :**

कोकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. - आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१



**WITH BEST COMPLIMENTS FROM**

मे. दि.वा. भाटवडेकर

६४०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,

टेलर्स आणि क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. - २४४५६०४७



*With Best Compliments From*

**Happy Home Services**

*Consultant for Real Estate*

S.S. Naphade
Ph. 25882893
Mobile : 9422302641

Deals in outright
Purchase / Rental of
Bungalows, Flats, Shops,
Plots & Property

Bldg. No. B-3, Flat No. B-6,
Chintamaninagar, Anand Park,
Aundh, Pune - 411 007.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# छंद माझा वेगळा...

**शब्दांकन : महेश खरे**

**एकदा वडीलांनी हौसेने, तेव्हा अप्रुपाचे असलेले भिंतीवरील घड्याळ कोणाकडून तरी आणले. वडील बाहेर गेले असताना, या महाशयांना राहवले नाही. त्यांनी हळूच जाऊन ते घड्याळ घेतले आणि उघडले. चावी फिरवली की फिरणारे काटे, आतील स्प्रिंग्ज, चक्रे बघून त्याचे भान हरपून गेले. नादामध्ये एकएक गोष्ट बघताना परत नेहमीचीच गडबड झाली.**

सुमारे ८० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे... कोकणच्या 'रत्नागिरी जिल्ह्यातील' घाटिवळे गावातील एका कुटुंबातील मुलाची. गावातील देवळात भरणाऱ्या शाळेत जाणारा हा मुलगा, अतिशय चौकस बुद्धीचा होता. कधी वडीलांच्या नवीन छत्रीत पाणीच साठवून बघ; तर कधी त्यांनी हौसेने आणलेल्या ग्रामोफोनच्या आत काय असतं हे बघण्यासाठी तो उघडून बघ, असे सतत उद्योग सुरु असत. त्यापायी बऱ्याचदा ओरडाही खात असे.

एकदा वडीलांनी हौसेने, तेव्हा अप्रुपाचे असलेले भिंतीवरील घड्याळ कोणाकडून तरी आणले. वडील बाहेर गेले असताना, या महाशयांना राहवले नाही. त्यांनी हळूच जाऊन ते घड्याळ घेतले आणि उघडले. चावी फिरवली की फिरणारे काटे, आतील स्प्रिंग्ज, चक्रे बघून त्याचे भान हरपून गेले. नादामध्ये एकएक गोष्ट बघताना परत नेहमीचीच गडबड झाली. आतला कोणता तरी भाग नादुरुस्त झाला. मग महाशयांची गाळण उडाली. वडील घरी आल्यावर त्याला या भोचकपणाबद्दल अर्थातच शिक्षा झाली. अतिशय चौकस असलेल्या या मुलाने, मोठं झाल्यावर घड्याळांच्या दुरुस्तीचे सर्व ज्ञान मिळविले. वेगळ्या प्रकारची, विविध आकारांची ३५०० हून अधिक घड्याळे जमा केली. तो मुलगा आता, सुप्रसिद्ध घड्याळ संग्राहक श्री. विष्णू जयराम खांडेकर म्हणून ओळखला जातो. त्यांचा हा संग्रह, पु.ल. देशपांडे, माणिक वर्मा, सुशीलकुमार शिंदे, अनिल काकोडकर अशा अनेक मान्यवरांनी बघितला व त्यांचे कौतुक केले आहे. त्यांच्या या छंदाविषयी त्यांच्याच शब्दांत माहिती घेऊया. घाटिवळ्याहून नंतर पुढील शिक्षणासाठी मी साखरपा नावाच्या मोठ्या गावी गेलो. तिथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाऊ लागलो. घराघरांतील मुलांना शाखेत आणायला मी त्यांच्या घरी जात असे. तिथे भिंतीवर टांगलेले आणि बंद पडलेले घड्याळ दिसले की, त्यांच्याकडून दुरुस्त करण्यासाठी मागून घेत असे. बंद पडलेले घड्याळ फुकट दुरुस्त करुन मिळण्याच्या आशेने लोकही आपले घड्याळ देत असत. जुन्या अनुभवावरुन शहाणं होऊन, मी काळजीपूर्वक घड्याळ उघडून, साफसूफ करून परत बंद करत असे. या खटाटोपात काही बंद घड्याळे सुरूही होत असत. हळूहळू एक शाळकरी मुलगा घड्याळ दुरुस्त करतो! अशी ख्याती इतरांच्या कानावर जाऊ लागली व मला आणखी बंद पडलेली घड्याळे मिळू लागली. त्यावेळी घड्याळे दुरुस्त करण्याचे दुकान जिल्ह्याच्या गावाला म्हणजे रत्नागिरीत होते. मी त्या त्या दुकानातील कारागिरांच्या आसपास घोटाळत असे आणि ते कसे काम करतात ते गुपचूप निरखून बघत असे. पुढे मग पुण्याला किंवा मुंबईला जाऊन मी विविध पुस्तकांमधून, एनसायक्लोपिडीयातून घड्याळाच्या अंतर्गत रचनेची माहिती मिळवली आणि घड्याळांची दुरुस्ती अधिक नीटसपणे सुरु केली. पुण्याला नोकरी करता करता हा छंदही जोपासणे सुरु होते. माझ्याकडचा घड्याळांचा संग्रहही हळूहळू वाढत होता. पण तेव्हा नशिबाचा जोरदार फटका बसला. १९६१ साली पानशेत धरण फुटून पुण्यात आलेल्या पुरामध्ये माझ्या घरातील सर्वकाही वाहून गेले. मेहनतीने जमा केलेली घड्याळेही त्यात होती.


मित्रांकडून मदत घेऊन, बँकेतून रुपये ५००० कर्ज काढून, मी मुंबईमध्ये गोरेगावला जागा घेतली आणि पुन्हा नव्याने सुरुवात केली. मुंबईत बीएआरसी मध्ये सायंटिफिक ऑफिसर म्हणून नोकरी करताना, मी हा छंद आणखी जोपासला. यासाठी, मला श्री. शेषाद्री नावाच्या माझ्या वरिष्ठांनी सहकार्य केलं. दिवसभराचे काम चोखपणे पूर्ण करुन, जेवणाचा अर्धा तास व दोन वेळची चहापानाची १५-१५ मिनिटे वाचवून, मी दर शुक्रवारी वरिष्ठांच्या परवानगीने कार्यालयातून एक तास लवकर निघत असे. भेंडीबाजार येथील जुन्या बाजारात फिरुन मी वेगवेगळी घड्याळे घेत असे.

– क्रमश:

# पवित्र अन् रमणीय - बद्रीकेदार

**डॉ. गायत्री यल्लापूरकर, ९७४२०२१३५९**

आज ८ मे. आजपासून खऱ्या अर्थाने यात्रेची सुरुवात होणार होती. रोजच सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान निघायचे असल्याने, आता रोज 'ब्राह्मे मुहुर्ते उत्तिष्ठे' म्हणजे पहाटे ४-४।। ला उठणे होणारच होते. आता शहरी परीसर हटून निसर्गरम्य गढवाल (उत्तराखण्ड) सुरु झाला होता. इतका निसर्गरम्य परिसर आहे की क्षणोक्षणी फोटो काढायचा मोह पहिल्या पहिल्यांदा झाला. मग सगळीकडे हे असेच आहे हे, लक्षात आल्यावर हे फोटोचं वेड थोडे थंडावले. नागमोडी वाटातून उंचउंच कड्यांना वळसे घालत, अथांग दऱ्यांमध्ये खळखळणाऱ्या नद्या - हिरवीगार वनश्री पहात मजेत प्रवास सुरु होता. 'देवप्रयागला' संथ 'अलकनंदा' खळाळत्या अल्लड 'भागीरथीला' मिळते. या संगमाचे-प्रयागाचे रुप डोळ्यात साठवून निघालो. ते थेट 'कौंडील्य' या निसर्गरम्य ठिकाणी थांबलो. अलकनंदेच्या काठीच हिरव्यागर्द वनराईने नटलेले GMVN चे गेस्टहाऊस म्हणजे छोटी-छोटी कॉटेजेस आहेत. व रस्त्याला लागूनच रेस्टॉरन्ट आहे. इथेच रॉफ्टींग कॅम्प पण असल्याने वरचेवर युवकयुवती त्याची तयारी करत असलेले दिसले. ह्या रेस्टॉरन्टमध्ये छोले-पुरी-चहा असा दमदार नाश्ता केल्यावर खूपच छान वाटले. ह्या पूर्ण प्रवासात (बद्रीकेदार) पाच संगम किंवा प्रयाग आहेत. देवप्रयाग, कर्णप्रयाग, रुद्रप्रयागला, नंदप्रयाग, विष्णुप्रयाग कौंडील्यहून जाताना कर्णप्रयागही दाखवला. इथे कर्णाने तपश्चर्या केली होती. दुपारी १-१।। वाजता रुद्रप्रयागला पोचलो. GMVN च्या रेस्टॉरन्टमध्ये जेवण घेतले. हे गेस्टहाऊस अगदी मोक्याच्या ठिकाणी आहे. गॅलरीतून रुद्रप्रयागचा संगम छान दिसतो. जेवण करुन प्रत्यक्ष संगमाच्या ठिकाणी ४०-५० पायऱ्या उतरुन गेलो. इथे अलकनंदा व मंदाकिनी यांचा संगम आहे. थंडगार पाण्यात पाय पडताच इतके छान वाटले. सुखद शिरशिरीने तन-मन प्रसन्न झाले. अर्थात वेळाची मर्यादा असल्याने मनाला आवरुन तिथेच असणाऱ्या मारुती मंदीरात दर्शन घेऊन गाडीत परतलो. आता चढण तीव्र झाली होती. गारवाही वाढू लागला होता. वर्दळ, रस्त्यावरची गजबज कमी झाली होती. आम्ही रामपूरला पोचलो. आज इथे मुक्काम होता.



बद्रीकेदार

भव्य पहाडावर वसलेल्या ह्या गेस्टहाऊसकडे पोहोचताच, लाल गुलाबी डेरेदार फुलानी डवरलेली गुलाबाची झाडे, आमचं हसून स्वागत करत होती. नजर उंचावून पाहीलं मात्र; ओहो! आहाहा! अप्रतिम! मावळत्या उन्हात चांदीसारखी चमचमणारी बर्फाच्छादीत हिमशिखरं काय सुंदर दिसत होती. काय ती भव्यता अन् सौंदर्य! मन इतकं, इतकं हरखून गेलं म्हणून सांगू!

रुममध्ये फ्रेश होऊन मागच्या बाल्कनीत गेलो; तर उत्तुंग हिरव्यागार पर्वतराजीच्या माथ्यावर चमकणारी तीच ती हिमशिखरं आम्हाला खुणावत होती. शुभ्र ढगांशी त्या शुभ्रशिखरांचे कितीतरी वेळ हितगूज चालले होते. इतका उत्साहउल्हास तना-मनात संचारला की, लगेच फिरायलाच बाहेर पडलो. थोडं थोडं म्हणत १-१।। कि.मी. वरच्या सीतापूरपर्यंत आलो. आता पाऊस सुरु झाला. म्हणून हातमोजे - शेंगदाणे अशी तुरळक खरेदी करुन परतलो. उद्या केदारनाथला १४ कि.मी. चढत जायचे होते ना!

९ मे - आज संकष्टी म्हणून घरुनच आणलेले दाण्याच्या कुटाचे लाडू, बटाटा चिवडा, शेंगदाणे असे खाणे व दिवसाचे कपडे, गरम कपडे, टॉर्च इत्यादी सॅकमध्ये भरले. बाकीचे सामान गेस्टहाऊसच्या लॉकरमध्ये ठेवले. ६ वाजता ट्रॅव्हलर टेम्पोत बसून ८-१० कि.मी. दूर असणाऱ्या गौरीकुण्डला गेलो. यापुढे बस/गाडी जात नाही.

गौरीकुण्डला गरम पाण्याचे झरे आहेत. गणेशजन्माची कथा इथेच घडली म्हणे. स्त्री-पुरुषांना स्नान करण्यासाठी स्वतंत्र कुंडे आहेत. तिथून बोळवजा अरुंद रस्त्यातून केदारनाथच्या मार्गाला लागलो. वाटेतल्या दुकानात २०/२० रु. ला काठ्या विकत घेतल्या. त्यांचा पुढे खूपखूप उपयोग झाला. आमच्या १३ जणांच्या ग्रुपमधले आम्ही तिघंच. आम्ही दोघे व पस्तिशीची बेंगलोरची सौ. अमृता चालत जाणार होतो. बाकीचे घोडे (१८००/-) किंवा दंडी-डोली (५०००/+) यातून जाणार होते. श्री. जोशीनी हेलिकॉप्टरचे बुकींग केले होते. (७५००/- एकेरी) पण खराब हवामानामुळे त्यांच्या कंपनीचे त्यावेळचे हेलिकॉप्टर रद्द झाले. पण नंतर आम्हाला खूप हेलिकॉप्टर जाताना दिसली. मग ते पण डोलीतून गेले. दैव यालाच म्हणावे ना! अमृताचे सामान हिटर, कॉफीमेकर इत्यादीमुळे जड झाले होते, मग तिच्या आग्रहाने सामानासाठी (तिघांच्या ३ सॅक्स) एक कंडी उर्फ पिट्टू ठरवला. ८००/- रुपये पाठीवरच्या टोकरीत सामान/लहान मुल वाहून नेतात. त्याला कंडी/पिट्टू म्हणतात. हा मूळचा नेपाळचा. चारधाम यात्रांच्या मोसमात दरवर्षी भारतात येऊन पैसे कमावतो. मग आपल्या देशात परत जातो. जय केदारनाथ म्हणून आमच्या या ट्रेकला सुरुवात केली तेव्हा; सकाळचे ७।। वाजले होते.

पहिल्या २ कि.मी. च्या टप्प्यात घोडेवाले/दांडी कंडीवाले या सर्वांची एकच झुंबड उडाली होती. स्टेशनवर रिक्षावाले मागे लागतात. तसे घोडेवाले सारखे मागे लागत होते. खालची पायवाट दगड-धोंड्यांची, पायऱ्यांनी चढणारी घोड्यांच्या लिदीने माखून गेली होती. या सर्व गर्दीतून कशीबशी वाट काढत काढत चालत होतो. पण पुढे जो तो आपापल्या कमीजास्त वेगाने मागे-पुढे झाला. रस्ता जरा मोकळा झाला. एका बाजूला उंचउंच पर्वतकडे अन् दुसऱ्या बाजूला हिरवाईने नटलेली, मंदाकिनीच्या खळाळत्या प्रवाहाने नजर वेधून घेणारी खोल-खोल दरी! दूरवरती हिमशिखरांचे नजराणे लक्ष वेधून घेत होते. या साऱ्याकडे पाहताना भान हरपून जात होतं. पण

आपल्याच मस्तीत वरुन/खालून जाणाऱ्या घोड्याची धडक बसली की, क्षणार्धात मन पृथ्वीवर यायचं.

उत्तराखंड (पूर्वीच गढवाल) मधे प्लास्टीकवर अगदी कडक निर्बंध आहेत. लोक ते पाळतानाही दिसले; म्हणून त्यामानाने कचरा खूप कमी! शिवाय १-१ कि.मी. वर शौचालये होती. पिण्याच्या पाण्याची सोयही अशीच जागोजागी केलेली दिसली. घोड्याची लिदही वारंवार झाडून साफ केली जाते. यामुळे प्रचंड गर्दी असूनही बऱ्यापैकी स्वच्छता होती हे वाखाणण्यासारखे वाटले. जागोजागी चहा/मॅगी/परोठ्याचे स्टॉल्स आहेत. कोल्ड्रींक्सही चिकार! मात्र महाग. पाण्याची बाटली. ३०/- रु. ना. तसंच बरेचजण शिजवून तिखटमीठ लावलेले 'चणे' खाताना दिसले. त्यामुळे शक्ती टिकून रहात असावी. इथल्या घोड्यांना मात्र म्हणे रात्री एकदाच 'गूळ' खायला देतात. मात्र जीवन किती कष्टाचे! शाळा-बिळा नाहीच. मुले मोठी झाली की घरच्या किंवा बाहेरच्या कामाला लोक लागतात. भरपूर शारीरिक कष्टाशिवाय पर्यायच नाही. आणि खूप सज्जन. जसजसे वर जाऊ लागलो तशी चढण अधिक अवघड होत होती. शरीर दमल्यामुळे वेगही मंदावला होता. जमेल तेवढे चढायचे. मग थोडे थांबून परत चालू लागायचे. अनेक जागी बाकडी आहेत. किंवा स्टॉल्ससमोर बसले तरी कोणी काही म्हणत नाही. ७ कि.मी. आल्यावर रामबाडा हे छोटे गाव लागते. इथे जरा थांबून फराळ केला. अमूल दूध प्यायले. गम्मत म्हणजे फार वेळ विश्रांती घेणे धोक्याचे; कारण मग शरीर आळसच करु लागते. पिठ्ठूवाल्याने आधीच जेवण -(पाणी -म्हणजे कोल्ड्रींक) घेतले होते. नियमात नसले तरी यात्रेकरुनाच ह्या घोडे-दांडी-कंडीवाल्यांचा चहा, जेवणखर्च करावा लागतो. आता परत 'जय केदारनाथ' म्हणून चालायला सुरुवात केली. दु.चे १२।। वाजून गेले होते. १० कि.मी. अंतरावर एक साध्या चपला घालून चढणाऱ्या ८० वर्षे वयाच्या नऊवारी नेसलेल्या आजीबाईंना पाहीले अन् थक्क झालो. बीडहून एक प्रवासी संघ आला होता. ११ कि.मी. चढेपर्यंत १ वाजून गेला होता. अन् हवा एकदम बदलली. आकाश झाकोळले. माझा चालण्याचा वेग खूपच मंदावला होता अन् ५-१० मिनिटांनी दम लागून थांबावे लागत होते. तो पिठ्ठू बरोबरच होता, म्हणाला बहनजी घोडा करलो। अब बासिदा आयेगी-बरफ के गोले गिरेंगे तो मुश्किल होगी। मग ह्यांना सांगून ३ कि.मी. साठी घोडी ठरवली २५०/-रुपयांना। तिचे नाव 'काजोल' होते. ह्यांनी मात्र पूर्ण १४ कि.मी. चालून ही यात्रा पूर्ण केली. आयुष्यात पहिल्यांदा घोड्यावर बसले ती थोडी घाबरतच। घोडेवाला मागे कुठेतरी होता. 'काजोल' भलतीच अवखळ। आपल्या मस्तीत चालताना ती एकदम एखाद्या पायी चालणाऱ्याशी लगट करु लागे. मग तो वाटसरू व मी दोघेही ही-ही हॅ-हॅ करून, ओरडून तिला आवरायचा प्रयत्न करायचो. घोडी असल्याने असेल, काही घोडेही सारखे-सारखे जवळ यायचे. शिवाय घोड्यावर बसल्याने कंबर व पायांवर विशिष्ट ताण येतो. कसे काय पूर्वीचे लोक घोड्यावर बसून लढाई करायचे? मला एकदम खूपच आदर मनात वाटू लागला. एकदाचे २।। ला पोचलो. हे चालत ३ पर्यंत आले. शेवटचे ४-५ कि.मी. दोन्ही बाजूला बर्फाचे १०/१२ फूट उंच ढिगारे लागले. काही ढिगारे खालून वितळून तिथून पाणी वहात होते. त्यामुळे पायवाट ओली झाली होती. चिखल पण थोडा झाला होता, असेच पाव कि.मी. पुढे गेल्यावर मंदाकिनीवरचा पूल लागला. तो ओलांडून गेल्यावर आले 'केदारनाथ'. GMVN च्या गेस्ट हाऊसची पाटी अर्धी बर्फात बुडलेली होती.

- क्रमश:



**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्‌गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# ‘कॅन्सर माझा सांगाती’

सौ. आरती अ. हळबे.

**शब्दांकन – श्री. अविनाश हळबे**

**‘‘एकट्याच आलात? बरोबर कोणी नाही का?’’ या तिथल्या डॉक्टरांच्या प्रश्नाने नाही म्हटले तरी काही गंभीर गोष्ट असावी, अशी पाल मनात चुकचुकून गेली. ‘मॅमोग्राफी’ झाल्यानंतर त्या टेस्टचा रिपोर्ट डॉ. नाखरे यांच्याकडे आला. डॉक्टर मॅडमनी तो सांगायला मला आत बोलावले व पाण्याचा ग्लास पुढे केला. आता काय ऐकायला मिळणार आहे, या विचाराने माझ्या हाताच्या मुठी नकळत ओलसर होऊ लागल्या. त्या गंभीर मुद्रेने एकदा रिपोर्टकडे पाहत होत्या, तर एकदा माझ्याकडे.**

**‘‘काय आलाय रिपोर्ट?’’ कणभर शब्द उच्चारायला मणभर ताकद लावून मी विचारले.**

**‘‘तुमच्या ब्रेस्टमध्ये गाठ निश्चित आहे, पण ती ‘त्याची’ नसू सुद्धा शकते.’’ कॅन्सर हा शब्द न उच्चारता त्या म्हणाल्या.**

**‘‘पण काळजी करु नका. आपण आणखी तपासण्या करुन मगच ठरवूयात.. ..**

माझ्या सत्यकथेचं नाव ऐकून दचकला असाल! पण, कॅन्सर खरंच माझा असा मित्र आहे, ज्याने जीवनाचा दृष्टीकोनच बदलून टाकला. प्रत्येक माणसाच्या जीवनात कधीकधी एखादाच असा प्रसंग येतो, जो एका क्षणात त्याला उध्वस्त करु शकतो. पण हाच प्रसंग सकारात्मक पद्धतीने हाताळला गेला तर, आपले जीवन संपूर्णपणे बदलू शकणारा ’टर्निंग पॉईंट’ ठरतो. माझ्या बाबतीत नेमकं हेच घडलं.

तस म्हटलं तर, मी माहेरहून आणि सासरहूनही एका सुशिक्षित–सुखवस्तू घरातली. आमचे चौकोनी कुटुंब. पती अविनाश टाटा मोटर्समध्ये डिव्हिजनल मॅनेजर, मी एक सुगृहिणी, मुलगी अमिता शिक्षण संपवून एका आय.टी. कंपनीत नोकरी करणारी आणि मुलगा चैतन्य – कॉलेजकुमार. एकंदरीत आमचा संसार सुखाचा चाललेला होता. टाटांच्या कोणत्याही कंपनीत कर्मचाऱ्यांची जितकी काळजी घेतली जात असेल, तितकी इतरत्र अपवादानेच आढळेल. याचाच एक भाग म्हणून आमच्या टाटा मोटर्समध्ये मॅनेजिअरल ग्रेडच्या कर्मचाऱ्यांसाठी पतीपत्नीच्या वार्षिक आरोग्य तपासणीची एक सुविधा उपलब्ध आहे. आम्ही दोघेही या योजनेचा लाभ घेऊन, दरवर्षी तपासणी करुन घेत असू. सप्टेंबर २००५ मध्ये आम्ही पती–पत्नी अशाच वार्षिक आरोग्य तपासणीसाठी ‘रत्ना हॉस्पिटलमध्ये’ गेलो. इतर तपासण्या झाल्यावर मी ‘गायनिक चेक अप’साठी हॉस्पिटलच्या गायनॉकॉलेजिस्ट डॉ. मीता नाखरे यांच्याकडे गेले. त्यावेळी मॅडमना माझ्या एका ब्रेस्टमध्ये थोडा घट्टपणा जाणवला. शंका नको म्हणून त्यांनी मला ‘मॅमोग्राफी’ नावाची तपासणी तातडीने करुन घेण्यास सांगितले. ‘मॅमोग्राफी’ हा काय प्रकार असतो, याची घरात कोणालाही नीट कल्पना नसल्याने दुसऱ्या दिवशी मी एकटीच हॉस्पिटलमध्ये गेले.

‘‘एकट्याच आलात? बरोबर कोणी नाही का?’’ या तिथल्या डॉक्टरांच्या प्रश्नाने नाही म्हटले तरी काही गंभीर गोष्ट असावी, अशी



पाल मनात चुकचुकून गेली. ‘मॅमोग्राफी’ झाल्यानंतर त्या टेस्टचा रिपोर्ट डॉ. नाखरे यांच्याकडे आला. डॉक्टर मॅडमनी तो सांगायला मला आत बोलावले व पाण्याचा ग्लास पुढे केला. आता काय ऐकायला मिळणार आहे, या विचाराने माझ्या हाताच्या मुठी नकळत ओलसर होऊ लागल्या. त्या गंभीर मुद्रेने एकदा रिपोर्टकडे पाहत होत्या, तर एकदा माझ्याकडे.

‘‘काय आलाय रिपोर्ट?’’ कणभर शब्द उचारायला मणभर ताकद लावून मी विचारले.

‘‘तुमच्या ब्रेस्टमध्ये गाठ निश्चित आहे, पण ती ‘त्याची’ नसू सुद्धा शकते.’’ कॅन्सर हा शब्द न उचारता त्या म्हणाल्या.

‘‘पण काळजी करु नका. आपण आणखी तपासण्या करुन मगच ठरवूयात.. .. जरा दोन मिनिटे बाहेर थांबता का?’’ डॉक्टर.

मी काही न बोलता बाहेर जाऊन तिथल्या बेंचवर बसले. थोड्या वेळाने मॅडमनी मला पुन्हा आत बोलाविले आणि म्हणाल्या, ‘‘मी तुमच्या मिस्टरांच्या कंपनीतले मेडिकल ऑफिसर डॉ. गोखल्यांशी बोलले आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे आपण त्या गाठीची पुढील तपासणी ऑन्कॉलॉजिस्टच्या सल्ल्याप्रमाणे करुन घेऊ आणि मगच काय ते ठरवू.’’

???

‘‘एकट्याच आलात, बरोबर कोणी नाही का?’’ या डॉक्टरांच्या प्रश्नामागचे गांभीर्य आता मला कळून चुकले आणि ‘ऑन्कॉलॉजिस्ट’ याचा अर्थ कॅन्सरतज्ञ ही माहितीही कोणी न सांगता उमगली.

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. | | | |
| Max Distance between spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range | rpm | (8)75-1850 | (8) 80-2310 |
| Vertical adjustment of arm | mm | 533 | 660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in



*With Best Compliments From...*

# J.P.F. METACAST PVT. LTD

**Manufacturers of** C I & S G I, machined & unmachined Castings.
Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Component
& Intricate Castings, Cylinder Heads.

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

An ISO 9000:2008 COMPANY
1ST ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI - 1998
Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007

**Commendation Certificate in Small Scale Manufacturing Industry**

695C, Udyambag P.O., Belgaum - 590 008
Ph. : 0831-2440664, Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com Website : www.jpfmetacast.com

घरी येताच अविनाशला मी सगळी हकिकत सांगितली, त्यांनी तातडीने प्रसिद्ध कॅन्सरतज्ज्ञ डॉ. शैलेश पुणतांबेकरांची अपॉईंटमेंट घेतली. तपासणी नंतर डॉक्टरांनी ती गाठ कशाची हे समजण्यासाठी बायोप्सी नावाची पुढील तपासणी करुन घेण्यास सांगितले. बायोप्सीत शरीराच्या त्या विविक्षित भागातला किंवा गाठीतला एक छोटासा तुकडा काढून घेऊन तज्ञ पॅथॅलॉजीस्टकडून तपासला जातो. या तपासणीतून ती गाठ म्हणजे साधे ट्यूमर आहे का इतर कोणत्या तरी व्याधीची आहे हे कळते.

२९ सप्टेंबरला, बायोप्सीचा रिपोर्ट आणून तो डॉ. शैलेशना दाखविण्यासाठी अविनाश डॉक्टरांकडे गेले – एकटेच! रिपोर्ट कळल्याबरोबर घरी फोन करायचे, असे घरातून निघताना ठरले होते. पॅथॅलॉजी लॅबमधून तो रिपोर्ट घेऊन, अविनाशनी डॉक्टर शैलेशच्या असिस्टंट डॉ. गीतांजली यांना दिला. तो वाचून मॅडमनी हळूवारपणे पण जे सांगितले ते ऐकल्यावर अविनाशला घरी फोन करण्याचे धाडस झाले नाही. कारण आता रिपोर्टने त्यांच्या हाता, पायातच नव्हे तर तोंडातही मणामणाचे शिसे ओतले होते. माझ्या ब्रेस्टमधील गाठ दुसरी तिसरी कशाची नसून कॅन्सरचीच आहे, यावर त्या रिपोर्टने शिक्कामोर्तब केले होते!

अविनाशने घरी येऊन ही बातमी खालच्या मानेने सांगताच एकच हल्लकल्लोळ उडाला. ब्रेस्ट कॅन्सर म्हणजे नक्की काय असते, हे कोणालाच माहिती नव्हते, पण 'कॅन्सर म्हणजे मृत्यूच' हा समज सगळ्यांचाच पक्का होता. आता पुढच्या हालचाली वेगाने करणे भाग होते, कारण जितका वेळ जाईल तितका कॅन्सर वेगाने पसरत जातो, हे एव्हाना कळून चुकले होते. डॉक्टरांकडे या समस्येवर आता एकच उपाय होता, जो एका स्त्रीच्या दृष्टीने स्त्रीत्वालाच आव्हान देणारा होता. तो म्हणजे शस्त्रक्रिया करुन एका बाजूची ब्रेस्टच काढून टाकणे हा होय! हे .. हे म्हणजे झाडावरचे एखादे फळ खराब दिसले म्हणून आख्खी फांदी तोडून टाकण्यासारखे होते. वेळप्रसंगी जातिवंत झाडावर आगंतुकपणे वाढणाऱ्या बांडगुळालाही असेच काढावे लागते हे खरे.. पण, तोच न्याय माणसाला? जे प्रारब्ध म्हणावे का नियतीची क्रूर चेष्टा? काही म्हटले तरी सत्याला सामोरे जाणे भाग होते. अविनाशचा मूळचा पिंड अध्यात्माचा असल्याने त्याने समर्थांची

''होणार ते होत जातं। प्रपंची जाहला आघात। डळमळेना ज्याचे चित्त। तो सत्वगुण।।''

ही ओवी आठवून स्वत:च्या मनाची समजूत काढायला सुरवात केली. पण माझे काय? मी तर एक सर्वसामान्य गृहिणी. साक्षात मृत्यू समोर ठाकला असताना मी काय करायचे? स्वत:च्या मनाची कशी समजूत काढायची? रडवेल्या तोंडाने आपल्या आईकडे पाहणाऱ्या मुलांना कसे सावरायचे? एकेक प्रश्न अक्राळविक्राळ राक्षसाचे रुप घेऊन माझ्यासमोर उभे राहू लागले. एकदोन दिवस संपूर्ण विषण्ण अवस्थेत गेले.

क्रमशः

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

**काटदरे**

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

**चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती**

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

**काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,**

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**

**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

# कारखानीस

**प्रेषक – सुहास खानवलकर, पुणे**

> **कारखानीस बाईंशी जी आजवर दहा मिनिटाहून जास्त बोलली नसेल, त्या एच.आर.च्या सुलक्षणाने मधाळ इंग्रजी भाषेत प्रास्ताविक केलं. इंटरनेटवर मिळणाऱ्या रेडीमेड 'फेअरवेल पोएम्स' मध्ये व्यक्तीच्या नावाच्या जागी तिने 'मृदुला' शब्द पेरताच कारखानीस बाईंसकट सगळेजण 'उर्मिला, उर्मिला' असे ओरडले. सुलक्षणाने मग उरलेली कविता मृदुला–उर्मिलाच्या गोंधळात एकदाची पार पाडली.**

बाई ऑफिसमधील आपल्या टेबलाशी आल्या आणि खुर्चीत बसल्या. सवयीप्रमाणे त्यांनी आपली पर्स टेबलाच्या उजव्या बाजूला ठेवली. सवयीप्रमाणे त्यांनी पाण्याने भरुन ठेवलेला ग्लास उचलला आणि कोरडा झालेला आपला घसा ओला केला. सवयीप्रमाणे त्यांनी टेबलावर ठेवलेल्या गणपतीच्या फ्रेमला दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि क्षणभरासाठी डोळे बंद केले. सवयीप्रमाणे त्यांनी डोळे उघडले. सवयीप्रमाणे त्यांनी टेबलाच्या वरच्या खणात ठेवलेली 'आजची कामं' लिहायची डायरी बाहेर काढली. सवयीप्रमाणे त्यांनी आजची तारीख उघडली– '३१ मार्च. त्यांचा हात तिथेच थबकला आणि किंचित थरथरलाही. त्याच थरथरत्या हातांनी डायरीच्या 'आजच्या पानावर' त्यांनी मोठ्या अक्षरात लिहिलं – Farewell to Mrs. Urmila Karkhanis at 4 pm!

ऑफिसमधली मिटिंग रुम पावणेचार वाजल्यापासूनच भरुन गेली होती. माणसं घोळके घोळके करुन उभी होती. त्यात कारखानीस बाईंबरोबर काम केलेली माणसं फारच थोडी. तरुण पोरं पोरी चिक्कार. फेअरवेलच्या निमित्ताने लोकांना अधिकृत ब्रेक मिळाला होता. त्यामुळे सगळेच जरा सैल झाले होते. चहाच्या कपात बिस्कीटे बुडवत गप्पांना उधाण आले होते. कालची भारत–पाकिस्तान मॅच, नेल पॉलिशच्या शेड्स, मनमोहन सिंग, फेसबुक, बॉसला शिव्या, मुलांचे शाळेतले प्रोजेक्ट्स, लिंकिंग रोड वरच्या स्वस्त चपला, क्रीम बिस्किटे पोटाला वाईट वगैरे चौफेर गप्पा चालू होत्या. अचानक चोर आवाजात कोणीतरी म्हणालं, 'मॅडम आल्या, मॅडम आल्या' .. सर्वांनी दरवाज्याकडे पाहिलं.

एकच शांतता पसरली आणि त्याच शांततेला छेदत टाळ्यांचा कडकडाट झाला.

कारखानीस बाईंचे बॉस 'साठे' कारखानीस बाईंना घेऊन आत आले होते. त्यांनी बाईंना खुर्चीवर बसायची विनंती केली. मग आधी साठ्यांनी बसायचं की कारखानीस बाईंनी यात दहा बारा सेकंद गेली.

मॅडम, आज तुमचा मान, कारखानीस बाईंपेक्षा दहा वर्ष लहान असलेल्या साठ्यांनी हे वाक्य म्हणताच, साठ्यांचे काही खास लोक उगाचच मोठ्यांदा हसले. ठेवणीतली पैठणी नेसून आलेल्या कारखानीस बाई अवघडून खुर्चीवर बसल्या. बाईंना इतकी गर्दी कदाचित अपेक्षित नसावी.

कारखानीस बाईंशी जी आजवर दहा मिनिटाहून जास्त बोलली नसेल, त्या एच.आर.च्या सुलक्षणाने मधाळ इंग्रजी भाषेत प्रास्ताविक केलं. इंटरनेटवर मिळणाऱ्या रेडीमेड 'फेअरवेल पोएम्स' मध्ये व्यक्तीच्या नावाच्या जागी तिने 'मृदुला' शब्द पेरताच कारखानीस बाईंसकट सगळेजण 'उर्मिला, उर्मिला' असे ओरडले. सुलक्षणाने मग उरलेली कविता मृदुला–उर्मिलाच्या गोंधळात एकदाची पार पाडली. त्यानंतर पुढे आल्या कारखानीस बाईंच्या लंच ग्रुप मधल्या शेजवलकरबाई. प्रसंगानुरुप गाणी म्हणायची यांना कोण हौस. 'निरोप कसला माझा घेता जेथे राघव तेथे सीता' हे गाणं त्यांनी या उर्मिलेसाठी का म्हणलं याचा उलगडा अनेक ज्येष्ठ मंडळींना झाला नाही. 'गीत–रामायण' हा कारखानीस बाईंचा weak point असल्यामुळे त्या तल्लीन होऊन ऐकत होत्या, मध्ये मध्ये स्वत:ही गुणगुणत होत्या. उरलेली तरुण मंडळी मात्र कंबोडिया देशाचे लोकगीत ऐकावं या उत्साहात ते गाणं ऐकत होती. (एकदाचं) गाणं संपलं.

'Anybody? Who wants to say few words about Karkhanis Madam?' सुलक्षणाने लोकांकडे बघत विचारले. माणसं स्वत:च्या मृत्युपेक्षा लोकांसमोर उभे राहून बोलायला घाबरतात. सगळेजण एकमेकाकडे पाहू लागले. सुलक्षणाची नजर चुकवून माणसं इकडे तिकडे, वर–खाली पाहू लागले.

मघाशी जागा न मिळाल्यामुळे उभे असलेले लोक आता स्वत:ला लकी समजू लागले. शेवटी 'हो–नाही' करत दोन तीन लोक कारखानीस बाईंविषयी बोलले. ज्या गोष्टींविषयी कारखानीस बाईंची त्यांच्यामागे

टिंगल केली जात असे, त्याच गोष्टींचे आज कौतुक चालू होतं. कुणी त्यांच्या कामाविषयी बोललं, कुणी मनमिळावू स्वभावाविषयी, तर कुणी त्यांच्या डब्यातल्या आंब्याच्या लोणच्याविषयी!

त्यानंतर भिडे सर उभे राहिले. बाईंविषयी भरभरुन बोलले. 'नोकरी चालू असतांना हे शब्द कानावर पडले असते तर, काम करायचा उत्साह आणखी वाढला असता' वगैरे वाक्यं बाईंच्या मनात येत असावी, असं बाईंचा चेहरा सांगत होता. भिडे सर बहुदा भाषणाची तयारी करुन आले होते. भाषणात ठिकठिकाणी पेरलेल्या कवितांच्या ओळींनी, शायरीने उपस्थितांच्या टाळ्या कमावल्या. भाषण संपताना त्यांनी सुलक्षणाला केक आणायची विनंती केली. बाईंनी केक कापला. टाळ्या वाजल्या. सुलक्षणाने पुढे होऊन केकचे क्रीम बाईंच्या गालाला लावलं, तसे सगळे हसले. बाई लाजल्या. सुलक्षणाने आता बाईंना चार शब्द बोलायची विनंती केली. टाळ्यांच्या कडकडाटात बाई चार शब्द बोलण्यासाठी उभ्या राहिल्या. बाईंनी घसा खाकरला आणि आपल्या भाषणाला सुरुवात केली.

'श्री. भिडे साहेब आणि ऑफिसमधले माझे सगळे सहकारी मित्र मैत्रिणी....'

बाईंनी एक छोटा पॉज घेतला आणि शांतता अधिकच हळवी झाली.

बाई पुढे बोलु लागल्या, तुमची सगळ्यांची हरकत नसेल तर, आज मी मराठीतून बोलणार आहे. तोडकं मोडकं हिंदी इंग्रजीमधून बोलण्यापेक्षा मला माझ्या भावना मराठीतून व्यक्त करायला आवडतील. अडतीस वर्षांपूर्वी मी या कंपनीत एक ट्रेनी म्हणून जॉईन झाले. तेंव्हा ही कंपनी खूप लहान होती. आता सारखे computers, emails, internet वगैरे त्याकाळी नव्हते. सगळे व्यवहार कागदावरती चालत. तुमच्या देशपांडे सरांना विचारा, आम्ही सगळे मिळून उत्सव-सण उत्साहात साजरे करत होतो. माणसं साधी होती. दिवसभर भांडून चार वाजता चहा प्यायला एकत्र जमायचो. हळूहळू कंपनी मोठी होते गेली. कामाच्या वेगाला महत्व आले. काम करायच्या पद्धतीत बदल होते गेले. बदलाला विरोध करणारी आमच्यासारखी सर्वसामान्य माणसं मागे पडू लागली. खूप उशिरा लक्षात आलं की बदलाला विरोध करण्यात जितकी एनर्जी खर्च केली त्याहून आणखी थोडी एनर्जी बदल स्वीकारण्यात खर्च केली असती तर अधिक भलं झालं असतं. पण तसं सहसा होत नसतं. जुने विचार आणि नवीन गोष्टी स्वीकारण्याचा आकस यांना अहंकार नावाचा रबरबँड घट्ट बांधून ठेवतो. असो. मला आनंद आहे की, आम्ही केलेल्या चुका तुम्ही तरुण मुलं करत नाही. तुम्ही तरुण मुलांना बदलाचं आकर्षण आहे आणि वेगाचंही. परंतु या वेगात आपण किती वहावत जायचं याचं भान असू द्या. कुटुंबाला वेळ द्या, आरोग्याकडे लक्ष द्या. या कंपनीने आणि त्यामधील माणसांनी मला आयुष्यातील अविस्मरणीय आठवणी दिल्या आहेत. त्याचं मोल माझ्या रिटायरमेंट फंडापेक्षा खूप पटीने जास्त आहे. बाईंचा कंठ दाटून आला.

वातावरण हलकं व्हावं या उद्देशाने भिडे साहेबांनी पटकन विचारलं, मॅडम, रिटायर झाल्यावर कंटाळा नाही येणार? कारखानीस बाई हसून म्हणाल्या, 'साहेब, बाई कधी रिटायर्ड होते का?' सगळ्यांच्या हळू हसण्याचा आवाज आला. बाई म्हणाल्या, जोक्स अपार्ट. तुम्हा सगळ्यांना एक गोष्ट सांगते. माझ्या वडिलांनी सांगितलेली. कदाचित या गोष्टीत साहेबांच्या प्रश्नाचं उत्तर मिळेल. एक राज्य असतं, त्या राज्याचा एक नियम असतो. कुठलाही राजा पाच वर्षांहून जास्त काळ राज्य करू शकतच नसतो. त्या राज्याचा आणखी एक विचित्र नियम असतो. पायउतार झालेल्या राजाला एका होडीतून घेऊन जाण्यात येत असतं. नदीच्या त्या काठावर एक घनदाट जंगल असतं. त्यात जंगली प्राणी देखील राहत असतात. अशा जंगलात त्या राजाला सोडून देण्यात येत असतं. एकदा अशाच एक राजाची पाच वर्षांने मुदत संपते. नियमाप्रमाणे तो त्या होडीत बसतो. होडी नदीच्या मध्यभागी येते तरी तो निवृत्त राजा शांत बसून असतो. होडीचा नाविक अस्वस्थ होतो. तो हळूच राजाला म्हणतो, महाराज माफ करा. मी आत्तापर्यंत इतक्या राजांना या होडीतून समोरच्या जंगलात सोडलेलं आहे. प्रत्येक राजा होडीत बसल्यावर किती घाबरलेला असायचा! तुम्हाला त्या जंगलाची जराही भीती वाटत नाही? तो निवृत्त राजा शांतपणे म्हणाला, मी ज्या दिवशी या राज्याचा पदभार सांभाळला त्या दिवशीच मला हा 'जंगलाचा नियम' सांगण्यात आला होता. पाच वर्षांनी मला या ठिकाणी जाऊन राहायचं आहे, यासाठी मी माझ्या मनाची तयारी केली होती. नुसतीच मनाची तयारी नाही तर, माझ्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत मी त्या जंगलाचे रुपांतर एका सुंदर नगरीत केले आहे आणि म्हणूनच मला आता तिथे राहायची भीती वाटत नाही उलट आनंद होतो आहे! ... माझ्या वडिलांनी सांगितलेली गोष्ट माझ्या मनावर इतकी कोरली गेली की, त्या दिवसापासून निवृत्तीनंतरच्या त्या भयावह जंगलाचे सुंदर नगरीत रुपांतर करण्यास मी सुरुवात केली. माणसं जोडून, छंद जोपासून! त्यामुळेच असेल कदाचित, सुदैवाने, उद्यापासून घरी बसून काय करायचं हा प्रश्न मला पडलेला नाही. माझ्या घरच्यांना आणि इतरांना माझा उपयोग होऊ शकेल, अशी बरीच कामे माझ्या लिस्टमध्ये आहेत!.. ..

टाळ्यांचा कडकडाट कानात साठवत आणि हातात बुके, भेटवस्तू घेऊन कारखानीस बाई आपल्या टेबलाशी आल्या. आपल्या टेबलावरुन-खुर्चीवरुन त्यांनी मायेने हात फिरवला. आपल्या 'जागेला' नमस्कार करुन त्या निघाल्या. ऑफिसच्या लोकांनी कारखानीस बाईंना घरी सोडवण्यासाठी आज 'एसी-टॅक्सी' बुक केली होती. टॅक्सीजवळ सोडायला आलेल्या सगळ्यांचा निरोप घेत बाई टॅक्सीमध्ये बसल्या. टॅक्सी पुढे निघाली तशी बाईंनी मागे वळून आपल्या ऑफिसच्या इमारतीकडे पाहिलं पण तिथे इमारत नव्हतीच.. .. ..

.. .. .. कशी असेल? कारखानीस बाईंच्या डोळ्यात ती, अख्खी इमारत बुडून गेली होती!


## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पुर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |


बायको गेली माहेरी,
काम करी पितांबरी !
घरातील
स्वच्छतेची उत्पादने !
IMPROVED
Extra Thick
Pitambari
Sanit All
Super Power Sanitary Cleaner
5 in 1
Super Active Formula
पितांबरी
Always Shines Bright
तांबा, पितळ चमकावणारा पाउडर
Super Improved
Pitambari
Pitambari
Klenz
POWERWASH
THICKER
Pitambari
Dishwash Liquid
For Oily and Stubborn Stains
Rooperi
Instant Contact Silver Shine
PITAMBARI
Dishwash Bar
Kam Gale Chale Zyada
PITAMBARI
Dishwash Jar
AOS
पितांबरी
होमकेअर डिव्हीजन
पितांबरी जार : कमी विरघळे जास्त चाले!
पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., ठाणे -२ (०२२) ६७०३ ५५५५, टोल फ्री क्रमांक -१८००२२४४१८.
www.pitambari.com., ASM : राजेश जाधव (मध्य मुंबई)- ९१६७४९२७०६, संतोष देसाई : ९१६७४९२७२०

## ॥ संस्था वृत्त

**कोल्हापूरच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाने**, रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. संघाच्या कार्यकारिणीने सभासदांच्या सहकार्याने, हे वर्ष संस्मरणीय बनविण्याचा निर्धार केला आहे. त्या दृष्टीने गेले वर्षभर नियोजन सुरु होते. ६ ऑक्टोबर २०१२ हा या रौप्यमहोत्सव संकल्पपूर्तीचा सुवर्णदिन होता. श्री सत्यनारायणाच्या कृपाशीर्वादाने या वर्षाची सुरुवात झाली, हा रजतयोग होता. संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा व डॉ. प्रकाश गुणे या दाम्पत्याने पूजेसाठी यजमान पद भूषविले. संघाच्या बहुसंख्य सभासदांनी असीम उत्साहात, मांगल्यपूर्ण वातारवणात तीर्थप्रसादासह गप्पागोष्टी केल्या. ७ ऑक्टोबर २०१२ या दिवसाची सुरुवात रंगीबेरंगी होती. वरुणराजानेही त्या दिवशी बरसातीचा हात आखडता घेतल्याने, कोवळी सूर्यकिरणे उत्साहात द्विगुणित करीत होती. राम गणेश गडकरी सभागृहाचा परिसर रंगीबेरंगी वस्त्रांनी सजलेला आणि अत्तर- गजऱ्यांच्या सुगंधात न्हालेला होता. संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे यांनी, खास या समारंभासाठी लिहिलेल्या दिंडी गीताच्या तालावर, महिला समिती सदस्यांनी ताल धरला. अब्दागिरी, छत्र-चामरे, भालदार-चोपदार, अशा लवाजम्यासह अश्वारुढ झालेल्या, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई दिंडीच्या अग्रभागी होत्या. त्यांच्या मागोमाग कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूरच्या गेल्या २५ वर्षांतील ठळक घडामोडींचा मागोवा घेणारे '२५ वर्षांचा इतिहास - यशोगाथा' हे पुस्तक, सजविलेल्या पालखीत ठेवण्यात आले होते. दिंडीत तुळशी वृंदावन घेतलेल्या माहिलाही सहभागी झाल्या होत्या.

दिंडीच्या सांगते नंतर सभागृहाच्या प्रवेशद्वाराशी 'रंगीबेरंगी' फुगे घेऊन उभारलेल्या, चिमुकल्यांनी साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. रौप्यमहोत्सव समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रख्यात वक्ते डॉ. सच्चिदानंद शेवडे आणि 'पितांबरी' चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांनी मुलांच्या हातातील फुगे उडविले. रंगीबेरंगी फुग्यांनी संघाचा रौप्यमहोत्सव सुरु झाल्याचा संदेश, पाखरांच्या भरारीप्रमाणे आकाशात पोहोचविला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे कार्यकारिणीच्या सदस्यांनी औक्षण करुन स्वागत केले. कार्यक्रमात सुरुवातीला 'रौप्यमहोत्सवी' समितीचे अध्यक्ष श्री. रमेश दीक्षित यांनी मिश्किल शैलीत मनोगत व्यक्त केले. संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे यांनी संघातील सर्वांच्या सहकार्याचा उल्लेख करुन, भावपूर्ण शब्दांत साऱ्यांची मने जिंकली. श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांनी साऱ्यांच्या उत्साहाचे, भरघोस उपस्थितीचे आणि नेमक्या व नेटक्या संयोजनाचे, मन:पूर्वक कौतुक केले. कोणत्याही बाबीतील यशासाठी या गोष्टी बरोबरच कोणती वैशिष्ट्ये जपावी लागतात, तेही त्यांनी नर्मविनोदी शैलीत सांगितले.

या आनंद सोहळ्यातील अत्युच्च क्षण म्हणजे श्री. सच्चिदानंद शेवडे यांचे घणाघाती भाषण होय! त्यांनी कधी बंदुकीच्या गोळीसारखे विचार मांडले; तर कधी विनोदी किस्से ऐकवले. त्यांच्या भाषणात हशा आणि टाळ्यांचा संगम होता. त्याला श्रोत्यांची भरभरुन दाद मिळाली नसती तरच नवल ! साऱ्या ब्राह्मणांनी एकत्र येऊन आज, हक्कांसाठी लढण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पसायदानाने आणि त्यानंतरच्या स्वरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर** : संस्थेच्या रौप्यमहोत्सव वर्षांतर्गत कार्यक्रमांमध्ये, रविवार दि. २८ ऑक्टोबर २०१२ रोजी सुपसिद्ध 'देवल क्लब' येथे 'आरोग्य संगीत' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रौप्यमहोत्सव कार्यक्रम नियोजन समिती प्रमुख श्री. दिलीप गुणे यांच्या 'फायटो फार्मा' कंपनीच्या आर्ट सर्कल तर्फे, हा बहारदार कार्यक्रम सादर झाला.

अभिजात संगीतातील रागदारीवर आधारीत हिंदी-मराठी चित्रपट गीते आणि सुमधुर भावगीते, गझल यांचा मानवी तन-मनाच्या शुद्धतेकरीता, आरोग्याकरीता कसा उपयोग करता येईल, भावनिक संतुलन कसे राखता येईल, याचे गायन वाद्यसंगीताद्वारे अप्रतिमरित्या सादरीकरण केले गेले.

तरुण पण नामांकित असे बासरीवादक श्री. सचिन जगताप, व्हायोलिन मास्टर श्री. केदार गुळवणी व तबला नवाझ श्री. प्रशांत देसाई यांची जुगलबंदी तर अविस्मरणीय होती.

मध्यंतरात समिती अध्यक्ष श्री. रमेश दीक्षित व संस्था अध्यक्ष सौ. अनुराधा गुणे यांच्या हस्ते, गायक, कलाकार, तंत्रज्ञ यांचे सन्मान करण्यात आले. या वैशिष्टपूर्ण कार्यक्रमाचे प्रायोजकत्व घेऊन, श्री. दिलीप गुणे यांनी सर्व सभासदांना कोजागिरीचा आनंद दिला याबद्दल त्यांचे अभिनंदन.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आरेन हर्डीकर यांनी केले; तर आभाराचे भरीव काम श्री. नितेश जोशी यांनी केले. संस्थेचे संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.


*With Best Compliments from,*

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

*With*
*Best Compliments*
*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,
Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com
Shrikant Sakhalkar 9850130920



## || संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे** यांची वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार दि. २८ आक्टोबर २०१२ रोजी सकाळी ९.३० वाजता हॉटेल अश्विनी, नवी पेठ, पुणे येथे संपन्न झाली.

कार्यवाहंनी अहवालांतील काही मुद्रण दोष नजरेस आणून दिले व सदर दोषांबद्दल सभागृहाची माफी मागितली. श्री. लक्ष्मीकांत देसाई कोषाध्यक्ष यांनी वर्ष २०११–१२ ची आर्थिक पत्रके सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवली. सभासदांनी कांही शंका उपस्थित केल्या, त्यांस कोषाध्यक्ष व अध्यक्षांनी समर्पक उत्तरे देऊन सभासदांचे समाधान केले. त्याचप्रमाणे कोषाध्यक्षांनी २०१३–१४ आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रक सादर केले असता, त्यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व आर्थिक पत्रके व अंदाजपत्रकांस सर्वांनी मंजुरी दिली. त्यांनंतर लेखा परिक्षकांच्या नियुक्तीचे सर्व अधिकार, विश्वस्त मंडळास देण्यांचा ठराव मंजूर करण्यांत आला.

वर्ष २०१३ ते २०१५ या तीन आर्थिक वर्षांच्या निवडणूकीकरिता श्री. र.बा. सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली घटनेतील नियमानुसार तीन सदस्यीय निवडणूक मंडळ नेमले होते. श्री. र.बा. सप्रे यांनी जेवढ्या जागा होत्या, त्यापेक्षा अर्ज कमी आल्यामुळे खालील सभासद बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर केले.

१) श्री. गणेश गुर्जर २) श्री. गोपाळ भाटवडेकर ३) श्री. हेमकिरण बाक्रे ४) श्री. लक्ष्मीकांत देसाई ५) सौ. मेधा भाटवडेकर ६) श्री. दत्तप्रसाद सावकार ७) श्री. मकरंद फणसळकर ८) श्री. हेमंत पुराणिक ९) श्री. श्रीकांत गुंर्जर १०) श्री. श्रीगजानन गुर्जर ११) श्री. गिरीषकुमार टोळे १२) श्री, नंदकुमार सप्रे १३) श्री. दिपक भडकमकर १४) श्री. श्रीधर पंतवैद्य

नवीन विश्वस्त मंडळ दि. ०१.०४.२०१३ ते ३१.०३.२.०१६ या कालावधीकरिता असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले व घटना दुरुस्तीनंतरच्या पहिल्या निवडणूक मंडळावर काम करण्याची संधी निवडणुक मंडळाला मिळाली, याबद्दल त्यानी विश्वस्त मंडळाचे आभार मानले.

त्यानंतर श्री.र.बा. सप्रे व श्री. मयुरेश डिके यांना अध्यक्षांच्या हस्ते श्रीफळ देऊन सन्मान करण्यांत आला. श्री. विश्वनाथ ठाकूरदेसाई – निवडणूक मंडळाचे तिसरे सदस्य घरगुती कार्यक्रमामुळे सभेला उपस्थित राहू शकले नाहीत.

नंतर आयत्या वेळच्या अनेक विषयांवर उदाहरणार्थ पोस्टेजवर होणारा खर्च नियंत्रित करणे, काही सभासदांनी त्यांच्या परिसरांत काम करण्याची व्यक्त केलेली इच्छा, जुने कपडे, वस्तु, वृत्तपत्रे इत्यादींचे संकलन व वाटप यावर चर्चा झाली व अनेक सूचना करण्यांत आल्या.

अध्यक्षांनी नंतर सभेतील एकूण सर्व विषयांचा आढावा घेतला व सभासदांच्या सूचनांचा विचार करुन, शक्य ते सर्व केले जाईल असे आश्वासन दिले.

श्री. लक्ष्मीकांत देसाईंनी आभार व्यक्त केले व अध्यक्षांनी सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे –** संघाने बुधवार दिनांक ३१–१०–२०१२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रुती मंगल कार्यालयात ''कोजागिरी'' पौर्णिमेनिमित्ताने दुग्धपान आणि सुप्रसिद्ध गायक श्री. विनोद्भुषण आल्पे यांच्या मिश्र संगीताचा कार्यक्रम आयोजित केला. श्री. विनोद्भुषण आल्पे यांनी सर्व प्रथम 'मारवा' रागातील बंदिश गायली. श्री. भीमसेन जोशी, श्री. कुमार गंधर्व आणि श्री. वसंतराव देशपांडे यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेतले. आपल्या गुरुंच्या आवाजातील नाट्यगीते, भजने आणि भावगीते इंद्रायणी काठी देवाची आळंदी, या भवनातील गीत पुराणे श्री. एकनाथ महाराजांचा चंद्र पौर्णिमेचा, तसेच राहिले ओठातल्या ओठात शब्द माझे आणि अजुनी रुसुनी आहे,तर जो भजे हरीको सदा तोही परम पद पावेगा या भैरवीने सांगता करुन, उपस्थितांची वाहवा मिळवली.

संघाने उपस्थित सभासदांसाठी कोजागिरीनिमित्त, मसाला दुधाची व्यवस्था केली होती. श्री. विनोद्भुषण आल्पे, श्री. मोहन पारसनीस आणि श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. देव यांचा यथोचित सत्कार संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर यांनी केला. श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी सूत्रसंचालन केले आणि श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी सर्वांचे आभार मानले. नेहमीप्रमाणे श्रुती मंगल कार्यालयाचे व्यवस्थापनाच्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेवून, कार्यक्रमाची सांगता झाली.

**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

## संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे**

**नवीन कार्यालय:** या वर्षी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्यालय तळ मजला, हेमेंद्र को. ऑप. हौ. सोसायटी, गोखले मार्ग, नौपाडा ठाणे येथे सुरु करण्यात आले. (दू. ०२२ – ६७०३ ५५१२). ठाणे संघाचे सर्वांना नम्र आवाहन आहे की, संघाशी यापुढील सर्व संपर्क/पत्रव्यवहार नवीन कार्यालयाच्या पत्त्यावर करण्यात यावा. या कार्यालयाची जागा व इतर सर्व कार्यालयीन सुविधा श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांनी उपलब्ध करुन दिल्या आहेत. **नवीन कार्याकारिणीची नियुक्ती:** ठाण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या दि. २ जून, २०१२ रोजी पार पडलेल्या वार्षिक 'सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीत माजी कार्यकारिणी सदस्य व नवीन सदस्य असे संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. 'पितांबरी' उद्योगसमुहाचे प्रमुख श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांना नवे अध्यक्ष म्हणून तर श्री. संजय अंबर्डेकर, CA यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. कार्यवाहपदी श्री. अभय आठल्ये तर कोषाध्यक्षपदी सौ. माधुरी आठल्ये यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीत श्री. संतोष देव हे सह–कार्यवाह व सौ. रीना आठल्ये या सहकोषाध्यक्षपदी नियुक्त झाले असून, श्री. विनायक शेणोलीकर, श्री. अजित सरवटे, श्री. माधव धामणकर, सौ. माधवी कयाळ व श्री. सचिन ताटके हे कार्यकारिणीचे इतर सदस्य आहेत. नव्या कार्यकारिणीने नवीन सदस्य नोंदणी व संघटना मजबुती, संघाची कायमस्वरुपी वास्तु, निधी संकलन व आर्थिक सक्षमीकरण, विद्यार्थी / युवक / ज्येष्ठ नागरिक / व्यावसायिक यांच्यासाठी वेगळे उपक्रम या उद्दिष्टांवर विशेष भर देण्याचे निश्चित केले आहे.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे सांस्कृतिक कार्यक्रम:**

'सरींवर सरी' हा श्री. विनायक जोशी व सौ. मृदुला दाढे–जोशी यांनी सादर केलेला वर्षाऋतू–गीतांचा कार्यक्रम व मावळत्या कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार असा सोहळा रविवार दि. १२ ऑगस्ट २०१२ रोजी आयोजित करण्यात आला होता.

ठाण्यातील ज्येष्ठ शिक्षक श्री. मुरलीधर गोडे यांनी या समारंभाचे अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या हस्ते माजी कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना त्यांच्या निर्व्याज योगदानाबद्दल गौरवण्यात आले. माजी अध्यक्ष प्रा. दत्तात्रय बोरवणकर, उपाध्यक्ष श्री. रवींद्र सरदेसाई व कोषाध्यक्ष श्री. नरेश मुळ्ये यांचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. मात्र याची खंत सर्वांनाच लागून राहिली होती की, याप्रसंगी कार्यवाह सौ. सुषमा करकरे या काही कौटुंबिक कारणास्तव उपस्थित राहू शकल्या नाहीत. प्रा. बोरवणकर यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी गेली २३ वर्षे नेटाने पार पाडली. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच संघाची घटना, नोंदणी व इतर सर्व कायदेशीर गोष्टींची पूर्तता करणे शक्य झाले. त्यांच्या भरीव कार्याचा सर्व सदस्यांनी आदरपूर्वक गौरव केला. गेल्या १० वर्षांपेक्षाही जास्त काळ संघाच्या कामाची धुरा ज्यांनी समर्थपणे सांभाळली, त्या कार्यवाह सौ. सुषमा करकरे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला व सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव केला. अध्यक्ष श्री. प्रभुदेसाई यांनी श्री. गोडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. या कार्यक्रमास मुलुंड येथे नुकत्याच स्थापन झालेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्यवाह श्री. सप्रे व कार्यकारिणी सदस्य श्री. खांडेकर आणि श्री. लघाटे यांचीही उपस्थिती लाभली.


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...

... सर्व सेवा एकाच छताखाली



**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा